। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ११३ वा । गुरूवार दिनांक ०९ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्याचे मंगळसुत्र चोरले

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे : फिर्यादी नामे-अश्विनी हनुमंत शिंदे, वय २५ वर्षे, रा. मालेगाव ता. बार्शी जि. सोलापूर या दि.०७.०७.२०२६ रोजी समर्थ मंगल कार्यालय येथील रुम मध्ये धाराशिव येथे अश्विनी शिंदे यांचे पर्स मधील सोन्याचे मीनी मंगळसुत्र एकुण ५०,००० किंमतीचे संशईत स्नेहा रा. शिंगोली ता. जि. धाराशिव यांनी चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अश्विनी शिंदे यांनी दि.०७.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### लग्नाचे अमिष दाखवून त्याचे घरी नेवून तिच्यावर केला लैंगीक अत्याचार

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गम १७ वर्षीय ८ महिनेची मुलगी हीला मागील एक वर्षा पासुन ते दि.०७.०७.२०२६ रोजी हिस गावातील एका तरुणानी लग्नाचे अमिष दाखवून त्याचे घरी नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.०७.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-६४(१)(ळ),६४(२)(I) सह कलम ४ (१), ६ पोक्सो अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत कालीदास वय २९ रा. तडवळा ता. तुळजापूर जि. धाराशिव, हरीबा वय ३८ वर्षे, रा. तडवळा ता. तुळजापूर जि. धाराशिव, रामचंद्र वय ५२ वर्षे, रा. श्रीनाथ मंगलकार्यालय मागे ता. तुळजापूर जि. धाराशिव, प्रशात वय ३५ वर्षे, रा. तडवळा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०७.०७.२०२६ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे ॲटो रिक्षा क्र एमएच २५ ए.के.२८८३, टो रिक्षा क्र एमएच २५ ए.के. १६४० व टो रिक्षा क्र एमएच २५ ए.के.२११८ व ॲटो रिक्षा क्र एमएच २५ ए.के. १५६९ ही दिपक चौकाकडे जाणारे रोडवर दिपक चौक गेट समोर, हॉटेल पुष्पविहार समोर व धाराशिव कडे जाणारे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये तळजापूर पो.ठा. येथे स्वतंत्र ४ गुन्हे नोंदवले आहेत.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०७ जुलै रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ४९२ कारवाया करुन ४,७६,८०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून प्राप्त ७६२९ शेतकऱ्यांची माहिती अपलोड




धाराशिव (जिमाका) -थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमुक्ती आणि कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना -२०२६ च्या माध्यमातून घेतला आहे. जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. दि.धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धाराशिव यांच्यामार्फत जिल्ह्यातील ७३२९ शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याची माहिती अपलोड करण्यात आल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक श्री. पांडुरंग साठे यांनी दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत सहकार विभागाच्या पोर्टलवर पात्र कर्जदार शेतकऱ्यांची माहिती अपलोड करण्यात येत आहे.२ जुलैपर्यंत भूम तालुका – ३८३ शेतकरी (रक्कम १ कोटी ७१ लक्ष ८२ हजार रुपये),धाराशिव तालुका- २७१७ शेतकरी (रक्कम २३ कोटी ८६ लक्ष १२ हजार रुपये),कळंब तालुका – १३७९ शेतकरी (रक्कम ८ कोटी ७९ लक्ष ८४ हजार रुपये), लोहारा तालुका -१९६ शेतकरी (रक्कम १ कोटी २५ लक्ष २७ हजार रुपये),परंडा तालुका ९८१ शेतकरी (रक्कम ५ कोटी ८७ लक्ष ९ हजार रुपये), तुळजापूर तालुका – ८६९ शेतकरी (रक्कम ५ कोटी ८७ लक्ष ९ हजार रुपये),उमरगा तालुका – ६०१ शेतकरी (रक्कम ४ कोटी २ लक्ष ९ हजार रुपये आणि वाशी तालुका- ५०३ शेतकरी (रक्कम २ कोटी २ लक्ष ५० हजार रुपये) अशा एकूण ७ हजार ६२९ कर्जमुक्तीस पात्र शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड करण्यात आल्या आहे.या पात्र शेतकऱ्यांची रक्कम ५३ कोटी १६ लक्ष ८हजार रुपये आहे.

## रस्त्यात खड्डे, खड्ड्यात पाणी: धाराशिवकरांची पाण्यातून कसरत



धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)-महिनाभराच्या प्रतीक्षेनंतर अखेर वरुणराजाने मंगळवारी धाराशिव शहरात दमदार हजेरी लावली. पहाटेपासून सुरू झालेल्या संततधार पावसाने तीन तास शहराला झोडपले. सकाळच अधूनमधून सुरू राहिलेल्या या मुसळधार पावसामुळे शहरातील प्रमुख रस्ते जलमय झाले होते. रस्त्यांवरील खड्ड्यांत पाणी साचल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांना कसरत करावी लागत होती. सकाळीच पाऊस कोसळल्याने शाळकरी विद्यार्थी, नोकरदार आणि कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या नागरिकांची मोठी धांदल उडाली. अनेक ठिकाणी तुंबलेल्या नाल्यांचे पाणी थेट रस्त्यावर वाहिल्याने पालिकेच्या मान्सूनपूर्व कामांचे दावे पहिल्याच पावसात वाहून गेले.

दि. ७ जूनपासून मृग नक्षत्राला सुरुवात झाली असली तरी गेल्या महिनाभरात केवळ रिमझिम पावसानेच हजेरी लावली होती. त्यामुळे जमिनीत अपेक्षित ओलावा निर्माण झाला नव्हता, तसेच प्रकल्पांतील साठ्यातही वाढ झाली नव्हती. मागील चार दिवसांपासून आकाशात ढग येत असली तरी दमदार पावसाची प्रतीक्षा कायम होती. अखेर मंगळवारी पावसाने दिलासा दिला. हवामान विभागाने पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवल्याने शेतकरी आणि नागरिकांच्या आशा उंचावल्या आहेत. जिल्ह्यात २०२३ आणि २०२४ अशी सलग दोन वर्षे चांगला पाऊस झाला होता. यंदा मात्र सुरुवातीपासून पावसाने ओढ दिली होती. मंगळवारी झालेल्या या संततधारेमुळे खरीप हंगामाला गती मिळण्याबरोबरच जलसाठ्यातही वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सकाळी कामाच्या आणि शाळेच्या वेळेतच तीन तास पाऊस सुरू राहिल्याने जनजीवन विस्कळीत झाले. रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे वाहनचालकांना खोलीचा अंदाज येत नव्हता. अनेकांनी छत्री आणि रेनकोटचा आधार घेत वाट काढली. शहरातील वाहतुकीचा वेग मंदावल्याने अनेकांना कार्यालये आणि शाळांमध्ये पोहोचण्यास उशीर झाला. वाहतूक व्यवस्था आणि रस्ते नियोजनाची कसोटी घेतली.

गेल्या चार दिवसांपासून आकाशात ढगांची दाटी होत होती, मात्र अपेक्षेप्रमाणे पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. अखेर मंगळवारी पहाटेपासून वातावरणात सुखावह बदल झाला आणि संततधार पावसाला सुरुवात झाली. महिनाभराच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या या दमदार पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असून खरीप पिकांसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. प्रेरणीसाठी पावसाचा फायदा होईल. आता सर्वांचे लक्ष पुढील दोन दिवसांच्या हवामानाकडे लागले आहे. हवामान विभागाने पावसाचा इशारा दिल्यामुळे शेतकरी पेरण्यांच्या कामाला वेग देण्याची तयारी करत आहेत. आगामी दोन दिवसांत चांगला पाऊस झाल्यास धरणे, तलाव आणि पाणीप्रकल्पांतील जलसाठ्यात मोठी वाढ होऊ शकते.

## बसव प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम: ७४४ गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्वप्नांना बळ; महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त मानवतेची साक्ष...



मुरुम, (प्रतिनिधी) : महात्मा बसवेश्वरांनी जगाला दिलेला 'कायकवे कैलास' (कष्टातच ईश्वर आहे) हा विचार केवळ शब्दांत न ठेवता, तो कृतीतून सिद्ध करण्याचे काम मुरुम येथील बसव प्रतिष्ठानने केले आहे. बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधून प्रतिष्ठानच्या वतीने शहरातील विविध शाळांमधील ७४४ गरजू विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाळेत जाऊन शैक्षणिक साहित्याचे नुकतेच वाटप करण्यात आले. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांच्या पुढाकाराने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाने शिक्षणप्रेमी आणि समाजमन जिंकले आहे.

महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात ज्ञानाची दारे सर्वांसाठी खुली केली होती. याच महान विचारांचा वारसा पुढे चालवत डॉ. रामलिंग पुराणे यांनी आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी पुढाकार घेतला. विद्यार्थी हाच राष्ट्राचा खरा आधारस्तंभ आहे, त्यांना केवळ शिक्षणाची दारे उघडून देऊन चालणार नाही, तर त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी मदतीचा हात देणे हे आपले कर्तव्य आहे, असे प्रतिपादन डॉ. पुराणे यांनी याप्रसंगी केले.

बसव प्रतिष्ठानने मुरुम शहरातील विविध शाळांमधील ७४४ विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याचे संच भेट दिले. यामध्ये बॅग, पाणी बॉटल,वह्या, पेन, कंपास पेटी यासारख्या साहित्याचा समावेश होता. या उपक्रमात

जिल्हा परिषद शाळा १७०,

डॉ. झाकीर हुसेन उर्दू शाळा १६०, जिल्हा परिषद स्पेशल शाळा १३३, जिल्हा परिषद कन्या प्रशाला (माध्यमिक) १०२, जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा ६१, केंद्रीय प्राथमिक शाळा ५१, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (नाईकनगर) ५१, वसंत विद्यार्थी वसतिगृह १६ असे

एकूण ७४४ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. बसव प्रतिष्ठानने राबवलेल्या या उपक्रमामुळे ७४४ विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य उमलले. शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून, त्यांच्या पालकांनीही प्रतिष्ठानच्या या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. मुरुम शहरातील मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक आणि शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला आपला पाठिंबा दर्शवला. भविष्यातही अशाच प्रकारे समाजोपयोगी आणि शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबविले जातील, असा विश्वास डॉ. रामलिंग पुराणे यांनी व्यक्त केला आहे. बसव प्रतिष्ठानचे हे कार्य आजच्या काळात इतर संस्थांसाठी एक आदर्शवत प्रेरणा ठरत आहे.

## मराठा समाजाच्या विविध प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन सुरू

धाराशिव (जिमाका) मराठा समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संबंधित बाबींवरील शिफारशींच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे महामंडळ) तथा अध्यक्ष,मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली २९ मे २०२६ व २ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

बैठकीत हैदराबाद गॅझेटीअर लागू झाल्यानंतर अद्यापपर्यंत झालेल्या दाखले वाटपाचा आढावा घेण्यात आला.तसेच नोंदी शोधणे,कुणबी जात प्रमाणपत्र,जात पडताळणी प्रमाणपत्र याबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासाठी आणि इतर संबंधित समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन सुरू करून तिचा व्यापक प्रसार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.याशिवाय या विषयांचे प्रभावीपणे हाताळणी करण्यासाठी अधिकाऱ्यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यात नोंदी शोधणे,कुणबी जात प्रमाणपत्र,जात पडताळणी प्रमाणपत्र तसेच इतर संबंधित बाबींमध्ये नागरिकांना मदत करण्यासाठी श्री.दत्तात्रय गायकवाड,तहसीलदार (संगायो),जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य मिळावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे ०२४७२-२२७३०१ हा दूरध्वनी क्रमांक हेल्पलाईन म्हणून कार्यान्वित करण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन केले आहे की,कुणबी जात प्रमाणपत्र,जात पडताळणी प्रमाणपत्र तसेच इतर संबंधित समस्यांच्या निराकरणासाठी ०२४७२-२२७३०१ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून आवश्यक माहिती व मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा.

## भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांचा मोठा साठा जप्त; भूममध्ये सहा ब्रँडच्या ६१ डेअरी पावडर गोण्या ताब्यात

### अन्न सुरक्षा विभागाच्या कारवाईनंतर अनेकांविरोधात गुन्हा; दूध भेसळीप्रकरणी तपासाला वेग

धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यात अन्न सुरक्षा विभागाने केलेल्या धडक कारवाईत भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थांचा मोठा साठा उघडकीस आला आहे. इंदीरानगर येथील एका ट्रेडिंग कंपनीवर टाकलेल्या छाप्यात सहा वेगवेगळ्या ब्रँडच्या तब्बल ६१ डेअरी पावडरच्या गोण्या, तसेच इतर दुग्धजन्य साहित्य जप्त करण्यात आले. प्रत्येक गोणीचे वजन २५ किलो असल्याने या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या प्रकरणात सदरील ट्रेडिंग कंपनीसह संबंधित दूध संकलन केंद्रांचे संचालक आणि इतर संबंधित व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, जप्त करण्यात आलेल्या साहित्याचा वापर करून भेसळयुक्त दुग्धजन्य पदार्थ तयार केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

भूम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, जप्त साहित्याची तपासणी प्रयोगशाळेत केली जाणार आहे. अहवालानंतर प्रकरणात आणखी गंभीर कलमे वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या कारवाईमुळे जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायात खळबळ उडाली असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे. तपास पुढे सुरू असून या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही पोलीस आणि अन्न सुरक्षा विभागाकडून शोध घेतला जात आहे.

## शिराढोण पोलिसांचा 'ऑपरेशन क्लीन' सुरु होणार? अवैध धंदेवाल्यांनो सावध...! ४४ गावांच्या जबाबदारीसह सहाय्यक पोलीस निरीक्षक राम घाडगे यांचा कडक इशारा;



कळंब (रामेश्वर डोंगरे)- कळंब तालुक्यातील शिराढोण पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक राम घाडगे यांनी नुकताच प्रभारी म्हणून पदभार स्वीकारताच परिसरात कायदा व सुव्यवस्थेबाबत नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. तब्बल ४४ गावांच्या विस्तीर्ण कार्यक्षेत्राची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली असून, अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई होणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

शिराढोण, खामसवाडी, नायगाव आणि लोढटा या चार बीटमधील ४४ गावांचा कारभार शिराढोण पोलीस ठाण्याकडून पाहिला जातो. येथे एक सहाय्यक पोलीस निरीक्षक, दोन पोलीस उपनिरीक्षक, फौजदार आणि अंमलदारांसह सुमारे ३५ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, एवढ्या मोठ्या क्षेत्रात कायदा-सुव्यवस्था राखण्याबरोबरच अवैध धंद्यांवर लगाम घालण्याचे मोठे आव्हान घाडगे यांच्यासमोर उभे आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही भागांत हातभट्टी दारू निर्मिती व विक्री, गुटखा विक्री, मटका तसेच इतर कथित अवैध व्यवसाय वेळोवेळी सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत असतात. याशिवाय भुरट्या चोऱ्यांच्याही घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे. त्यामुळे नव्या प्रभारी अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून या प्रकारांना आळा घालावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

'जुन्या तक्रारी, नवी अपेक्षा'

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वीच्या कार्यकाळात मंगरूळ फाटा, नायगाव, शिराढोण, जवळा, चौसाळा आदी परिसरात हातभट्टी दारू, बनावट दारू विक्री आणि इतर कथित अवैध धंद्यांबाबत वारंवार तक्रारी होत होत्या. या प्रकारांचा परिसरातील तरुण पिढीवर विपरीत परिणाम होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

आता सहाय्यक पोलीस निरीक्षक राम घाडगे यांच्या नेतृत्वाखाली या तक्रारींवर किती प्रभावी कारवाई होते, अवैध धंदे खरोखरच बंद होतात का आणि कायद्याचा धाक पुन्हा निर्माण होतो का, याची उत्सुकता संपूर्ण ४४ गावांतील नागरिकांना लागून राहिली आहे.

## जिमचे सामान खरेदीसाठी पाच लाख दिले तरी सामान न दिल्याने केली फसवणुक

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत शुभम रा. घायाळ नगर जालना,प्रितम रा. तुळजापूर जि. धाराशिव, ह.मु. भाग्यनगर जालना, आमित रा. घायाळनगर जालना यांनी दि.१२.०६.२०२६ रोजी हंगरगा रोड प्रतिक्षा नगर कृष्णा सोसायटी तुळजापूर येथे फिर्यादी मंथन संतोष कदम, वय २७ वर्षे, रा. वेताळनगर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी नमुदांनी जिमचे सामान खरेदी करण्यासाठी रोख रक्कम एकुण ५,००,००० ही रोख व ऑनलाईन देवुनही फिर्यादीस अद्याप जिमचे सामान न देता त्यांची फसवणुक केली आहे.

तुमचे पैसे पण देणार नाही व सामान पण देणार नाही असे म्हणून धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- मंथन कदम यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे आनंदनगर येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## चुकीच्या बाबीची सुधारणा आवश्य करा

देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तरवर्षापेक्षा अधिक काळ झाला, तरी आपल्या देशात ब्रिटीश, मोगल, निजाम कालीन कारभार चालत आहे. त्यांनी घालुन दिलेल्या नियम, संस्कृतीआदिची वाटचाल बदललेली हे दिसून येते. भारताची संस्कृती महान आहे. भारतीय नितीमुल्यानुसार चालत होते. वेदाभ्यासी होती. गुण, कर्म व स्वभावानुसार चालत होते. जात हा फॅक्टर रामाच्या काळापासूनचा नाही. श्रीकृष्ण म्हणजे महाभारताच्या काळात सुद्धा जाती व्यवस्था नव्हती मग जाती कोठून आल्या. त्या आणल्या गेल्या. जे मुठभर ज्ञानी समजल्यांनी आणल्या. आपला स्वार्थ साधण्यासाठी आणल्या. एक बाब लक्षात येते रामायणकालीन बालविवाह होत नव्हते. तसा उल्लेख सापडत नाही. त्याच प्रमाणे पुर्वी जात नव्हती. केवळ नावावर सिंगल नावावर ओळखले जात होते. तसे पाहिले तर साधे उदा. घेतले तर रामाची पत्नी सीता कोणत्या जाती किंवा देशाची होती. रामाचे भाऊ व पांडव व कौरवांची नावे, जात व त्यांनी जातीत विवाह केल्याचे उदा. सापडत नाहीत. मग जात कोठून आली. त्याचे प्रमाणे आलिकडे जातीच्या आधारावर जे राजकारण चालू आहे. जे आरक्षणाचामुद्दा निर्माण होत आहे. त्याच प्रमाणे जो संघर्ष होत आहे तो मानव निर्मित आहे. स्वार्थी मानावाने भारत हा खिळखिळा व्हावा. भारत हा बलशाली देश आहे. सदृढ जनता आहे ती कमकुवत व्हावी हा हेतू साधण्यासाठी जातीचे राजकारणास वाव दिला गेला व जात आहे. ब्रिटीश निती ही कायम राहावी व आपली पोळी भाजता यावी हा उद्देश आहे. भारताला स्वराज्य मिळाले तरी लॉर्ड मेकाले शिक्षण पद्धती बंद केली नाही. भारताला नमवयाचे झाले, कमकुवत करावयाचे झाले तर जात फॅक्टर जीवंत ठेवला पाहीजे हा हेतू कायम सुरक्षित ठेवला जात आहे. हे पाप कर्म सतत जागृत ठेवण्याचे काम होत आहे. एक बाब लक्षात ठेवावी, भारतीय महिला ह्या कमकुवत नव्हत्या त्या बनविल्या गेल्या आहेत. मोगलाशी अनेक महिलांनी दोन हात केले होते. भारताचा खरा इतिहास लपविला गेल्याचा मोठा परिणाम आहे. जसे भारताला अहिंसेने स्वराज्य मिळाले नाही. रक्ताच्या नद्या वाहील्या आहेत हा इतिहास लपविला गेला आहे. भारतीय नेत्यांनी सर्वच चुकीचे केले नाही मात्र ज्या चुका जाणून बुजून केल्या त्याचे भोग भोगावे लागत आहे. भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांची फासी रोखता आली असती ती रोखली गेली नाही. जे स्वराज्यासाठी लढले, प्राणाची बाजी लावली त्यांना देशद्रोहीच काय अतिरेकी समजले गेले. हे सर्वात वाईट बाब आहे. त्यामुळे खरा इतिहास जनतेला जाणून बजुन भारतीय जनतेला कळू दिला नाही. मुळात वाईट चालीरिती भारतात नव्हत्या. भारत एक बलशाली देश होता. वेदाची आवाज घुमत होता. हिंदु संस्कृती श्रेष्ठ होती. अहिंसावादी होती. हिंसेला थारा नव्हता. बळीची प्रथा नव्हती. मोगलानंतर ती अमलात आणली केली. यज्ञात सुगंधी औषधी-वनस्पतीचा वापर केला जात होता. रामाच्या काळात यज्ञाला महत्त्व होते. यज्ञ केल्या शिवाय राम, योगीराज श्रीकृष्ण भोजन करीत नसत. मुळ इतिहास होता. त्याची तोडमोड केली गेली. स्वस्वार्थ व आपली पोटपुजेची व्यवस्था करण्यात आली. आजही मंदीरात प्रसाद म्हणजे भोग लावला जातो ती मुर्ती खाल्याचे कोणी पाहिले का? किंवा सीसीटिव्हीमध्ये कैद झाले का? उपाशी धार्मिकस्थळासमोरील व्यक्ती किंवा वृद्धाश्रमात दान केल्याने पुण्य लागते. विचारी मंडळी लोप पावत आहे. भारताला उतरती कळा ही महाभारतील युद्धानंतर लागली. या महाभारताच्या युद्धात अनेक विद्वान, योगी, ऋषीमुनी मारले गेले. अनेक ज्ञानी लोप पावले. समाप्त झाले. उरले ते भामटे मंडळी. त्यांनी धर्माच्या नावावर अनाचार सुरू केला. नको ते कार्य करू लागले. खरात सारखी भामटी मंडळींचे चालू लागले. तेच ज्ञानी मंडळी असती तर अंधश्रद्धेला बळी पडली नसती. श्रद्धा असावी मात्र अंधश्रद्धा नसावी. घरदार बरबाद होते. बाल विवाह प्रथा मोगल सम्राजानंतर सुरू झाली. लहान बालिकेस पळविणे व अत्याचार करणे हे कोणाच्या काळात होत होते. तेच कार्य आता होत असेल तर ते योग्य नाही. जातीप्रथा भारतात नव्हती, ती निर्माण केली गेली आहे. गुण, कर्म व स्वभावा पाहुन विवाहयोग्य असेलतरच विवाह लावला जात असत. बालविवाह केला जात नव्हता हे जाणून घ्यावे. भारताला अनेक मोगलांनी सुटले. सोमनाथमंदीर गजणीने लुटले. आजही हिंदु सोडले तर अनेक स्त्रीयाशी विवाह केला जातात. एकीकडे एक संविधान मानायाचे व दुसरे कडे विपरीत वागयाचे हे योग्य नाही. एक देश मानतो मग एक कायदा का मानते नाहीत? सर्वांना मोफत शिक्षण व आरोग्य सुविधा मिळालीच पाहिजे. आता एकाला एक व दुसऱ्याला दुसरा कायदा नको. आपलेच भारतीयांचे मोठ्या परिश्रमाने लिहीलेले संविधानानुसार वागले पाहिजे. चालले पाहिजे. यासाठी समसमानता आणण्याची जबाबदारी आपल्या सर्व देशातील नागरिकांची आहे. चुकीच्या बाबी घडल्या असतील तर त्यात सुधारणे करणे आपल्या देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. सुधारणा होणे अपेक्षित आहे. चुका होत असतात त्यात सुधारणे करणे आवश्यक आहे. भारताचे पहिले पंतप्रधान लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल असते तर बऱ्याच सुधारणा झाल्या असत्या. नको त्याला महत्व दिल्याचा परिणाम भोगत आहोत. पाकिस्तान देश निर्मिती स्वार्थी मंडळीच्या चुकीमुळे झाली. एकमेकाच्यामनात विष पेरण्याचे काम झाले. जे झाले ते चुकीचे झाले त्यात सुधारणा होणे अपेक्षित आहे. भारताचा गौरवशाली इतिहास जाणून घेण्याची गरज आहे. भारतात जातीप्रथा नव्हती किंवा बालविवाह नव्हते. बोटावर मोजण्याइतकी मंडळीने स्वस्वार्थासाठी व पोटभरण्यासाठी निर्माण केलेली प्रथा आहे ती संपविण्याची गरज आहे. जगात भारतीयांचा मान व सन्मान मोठा आहे. जगात भारतीयांचे काम गौरवशाली आहे याची आठवण सतत ठेवून चुका सुधारण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

# मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा, पुनर्विकास, आधुनिक तंत्रज्ञान आणि पूरनियंत्रणावर भर

**१३ हजार कोटींचा एकात्मिक पूर नियंत्रण आराखडा केंद्र शासनाला सादर -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**




**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाच्या (एमएमआर) सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने पायाभूत सुविधा, पूरनियंत्रण, पुनर्विकास, आधुनिक तंत्रज्ञान, जलसुरक्षा, वाहतूक व्यवस्था, आरोग्य सेवा आणि पारदर्शक प्रशासन यांचा समन्वय साधणारे व्यापक नियोजन हाती घेतले आहे. या माध्यमातून मुंबईला भविष्यातील जागतिक दर्जाचे, सुरक्षित आणि सक्षम महानगर म्हणून विकसित करण्यात येत आहे. तसेच मुंबईतील पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून १३ हजार कोटी रुपयांचा एकात्मिक पूरनियंत्रण आराखडा केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मुंबई आणि एमएमआर क्षेत्रावरील नियम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांने मांडलेल्या प्रस्तावाच्या चर्चेच्या उत्तरात दिली.

शहरातील ३७० पूरप्रवण ठिकाणी पावसाचे पाणी अवघ्या ३० मिनिटांत बाहेर काढण्याची व्यवस्था उभारली जाणार आहे. पूरनियंत्रणासाठी सध्या ५४७ पंप कार्यरत असून एमएमआरडीए, रेल्वे आणि इतर यंत्रणांसह एकूण ९९० पंप उपलब्ध आहेत. सहा मोठी आणि दहा मिनी पंपिंग स्टेशनही कार्यरत आहेत. यंदा अपेक्षित प्रमाणाच्या ११२ टक्के नालेसफाई करण्यात आली असून मिठी नदीतील ८३ टक्के गाळ काढण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यंदा मुंबईत अवघ्या सहा दिवसांत जुलै महिन्याच्या सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. सहा दिवसात कुलाबा येथे ८८२ मिमी आणि सांताक्रूझ येथे ९८८ मिमी पावसाची नोंद झाली. केवळ सहा दिवसांत वार्षिक पावसाच्या सुमारे ४२ टक्के पाऊस झाला. ताशी ५० ते ७५ किलोमीटर वेगाचे वारे आणि चार मीटरपेक्षा अधिक उंच भरतीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली. अशा परिस्थितीतही विविध यंत्रणांनी प्रभावी कामगिरी केली.

### नालेसफाईत एआय आधारित फसवणूक शोध प्रणाली

नालेसफाईतील गैरव्यवहार रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित फसवणूक शोध प्रणाली लागू करण्यात आली असून, खोटे दावे, चुकीची बिले आणि बनावट माहितीवर प्रभावी नियंत्रण आले आहे. या प्रणालीमुळे २०२५ मध्ये साडेबारा कोटी रुपये आणि २०२६ मध्ये ९.२५ कोटी रुपयांचा दंड संबंधित कंत्राटदारांवर आकारण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील उर्वरित कामे पुढील एक-दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, त्याचबरोबर मुंबईच्या दीर्घकालीन पूरनियंत्रणासाठी एकात्मिक आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### कनेक्टिंग लिंक प्रकल्प महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतिक

कनेक्टिंग लिंक प्रकल्प हा केवळ वाहतूक प्रकल्प नसून महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतिक असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पात जगातील सर्वात रुंद बोगदा, भारतातील सर्वाधिक उंच व्हायाडक्ट आणि सर्वाधिक उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. अलीकडील अतिवृष्टीत जलवाहिनीचे नुकसान झाले असले तरी बोगदा आणि पुलाला कोणतीही संरचनात्मक हानी झाली नाही. आपत्कालीन यंत्रणांनी अवघ्या १८ तासांत वाहतूक पूर्ववत केली असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

### पारदर्शक प्रशासन आणि डिजिटल नियंत्रण

मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी ई-निविदा, एसएपी प्रणाली आणि डिजिटल नियंत्रण प्रणाली लागू करण्यात आली आहे. शालेय साहित्य खरेदीत तसेच माहिती तंत्रज्ञान विभागातील निविदांमध्ये मोठी बचत झाली आहे. तसेच अवास्तव खर्चाच्या १,०३२ कोटी रुपयांच्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत.

### जलसुरक्षेसाठी पाणी पुरवठा यंत्रणेचे आधुनिकीकरण

मुंबईच्या वाढत्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी गारगाई प्रकल्पास आवश्यक वनमंजुरी मिळाली असून २०२९ पर्यंत ५०० एमएलडी अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. मनोरी आणि वर्सोवा येथे डिसॅलिनेशन प्रकल्प उभारले जात असून २०३० पर्यंत एक हजार एमएलडी गोडे पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. एमएमआरच्या वाढत्या पाणी गरजा लक्षात घेऊन पाणी पुरवठा योजनेचे आधुनिकीकरण करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### काँक्रीट रस्ते, बोगदे आणि पार्किंग प्रकल्पांना गती

रस्त्यांच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी मुंबईतील ९५ टक्के रस्ते काँक्रीटीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यातील ८९ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यातील ७३ टक्के काम पूर्ण झाले असून मे २०२७ पर्यंत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. वाहतूक व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी गोरेगाव-मुलुंड बोगदा, उत्तर किनारी मार्ग, विविध उड्डाणपूल, रेल्वे उड्डाणपूल आणि ईस्ट-वेस्ट कनेक्टिव्हिटी प्रकल्प वेगाने पूर्ण केले जात आहेत. बहुमजली रोबोटिक पार्किंग आणि भूमिगत पार्किंग सुविधांनाही गती देण्यात येत आहे.

### घनकचरा व्यवस्थापन आणि आरोग्य सुविधा

घनकचरा व्यवस्थापनासाठी ६०० मेट्रिक टन क्षमतेचा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असून त्यातून सुमारे ८ मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. आरोग्य क्षेत्रात सायन रुग्णालय, नायर रुग्णालय तसेच उपनगरीय रुग्णालयांचा विस्तार करण्यात येत असून सुमारे तीन हजार अतिरिक्त रुग्णशय्या उपलब्ध होणार आहेत. सर्व रुग्णालयांचा डेटा एकत्रित करणारी एचएमआयएस प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

### स्वयंपुनर्विकासाला गती

मुंबईतील पुनर्विकासाला गती देण्यासाठी स्वयं पुनर्विकास, म्हाडामार्फत समूह पुनर्विकास, क्लस्टर विकास आणि धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. स्वयं पुनर्विकासामुळे ६०० चौरस फुटांच्या घराऐवजी १,२०० ते १,४०० चौरस फुटांपर्यंतची घरे नागरिकांना उपलब्ध होत आहेत. म्हाडाच्या विविध प्रकल्पांतून एक लाख आठ हजार सदनिका उभारल्या जाणार आहेत. धारावी पुनर्विकासातून सुमारे १ लाख ६० हजार निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक घटकांचे पुनर्वसन करण्यात येणार असून पात्र सर्व रहिवाशांना धारावीमध्येच घरे उपलब्ध करून दिली जातील.

### डिजिटल ट्विन, ई-टीडीआर आणि एआय आधारित मंजुरी

मुंबई महानगरपालिकेत डिजिटल ट्विन प्रकल्प, एआय आधारित इमारत नकाशा मंजुरी प्रणाली, ई-टीडीआर एक्सचेंज, ऑनलाइन वित्तीय व्यवस्थापन आणि नागरिकांसाठी केंद्रीकृत तक्रार निवारण प्रणाली सुरू करण्यात आली आहे. नव्या एआय प्रणालीमुळे ६० टक्के माहिती स्वयंचलितरीत्या उपलब्ध होणार असून मंजुरी प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### २०४७ पर्यंत ८२५ अब्ज डॉलर्स जीडीपीचे उद्दिष्ट

एमएमआरच्या भविष्यातील विकासाचा आराखडा मांडताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०४७ पर्यंत या प्रदेशाचा जीडीपी ८२५ बिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. ३० नवीन बिझनेस हब, ३० परिवहन प्रकल्प, वॉटर मेट्रो, मेट्रो जाळ्याचा विस्तार, नवीन गृहनिर्माण प्रकल्प, एज्युसिटी, तिसरी आणि चौथी मुंबई यांसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्यात येणार आहे.

### सांस्कृतिक वारसा प्रकल्पांना प्राधान्य

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन पायाभूत सुविधांसह सांस्कृतिक वारसा प्रकल्पांनाही समान प्राधान्य देत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल आंतरराष्ट्रीय स्मारक प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तंत्रज्ञानाधारित अत्याधुनिक स्मारकाचे काम जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

### विकास प्रकल्पांचे आर्थिक नियोजन

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा प्रमुख आधार असून सध्या सुरू असलेल्या आणि पुढील तीन वर्षांत विविध टप्प्यांत पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांची एकूण किंमत १२ लाख २६ हजार ७०७ कोटी रुपये आहे. या सर्व प्रकल्पांचे आर्थिक नियोजन पूर्ण झाले असून कर्ज परतफेडीची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

### कांदळवन संरक्षणात वाढ

कांदळवनांचे संरक्षण हे मुंबई आणि किनारपट्टीच्या पर्यावरणीय सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, अतिरिक्त कांदळवन लागवडीवर शासनाने सातत्याने भर दिला आहे. केंद्र शासनाच्या २०२१ च्या आकडेवारीनुसार राज्यातील कांदळवन क्षेत्र ३०२.७० चौरस किलोमीटरवरून ३१५.०९ चौरस किलोमीटरपर्यंत वाढले असून १२.३९ चौरस किलोमीटरची वाढ नोंदविण्यात आली आहे.

### सदस्यांच्या सूचनांवर सकारात्मक भूमिका

विधानसभेतील चर्चेदरम्यान सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर शासन सकारात्मक भूमिका घेत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. फनेल झोनच्या प्रश्नावर लवकरच बैठक घेऊन निर्णय केला जाईल. पीटीएस आणि पीएपी सदनिकांच्या मागणीसंदर्भात आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. अतिरिक्त ०.५ एफएसआयला मुदतवाढ देण्याच्या मागणीचाही सकारात्मक विचार करण्यात येईल. सर्व सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी सिंगल तिकीट प्रणालीच्या सूचनेवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चिता कॅम्प-कोळीवाडा मेट्रो जोडणीसंदर्भात मेट्रो २-बीच्या विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

### मुंबई 'ग्रोथ इंजिन'; रोजगार आणि गुंतवणुकीला चालना

मुंबई आणि एमएमआर हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा 'ग्रोथ इंजिन' असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वाधिक पायाभूत सुविधा गुंतवणूक आणि परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) या भागात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत असून मुंबई देशाची फिनटेक राजधानी आणि स्टार्टअप हब म्हणून उदयास येत आहे. मुंबईबरोबरच पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि गडचिरोली पर्यंत विकासाची गती पोहोचविण्याचे शासनाचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### सन्मानाचे घर, रोजगार आणि आधुनिक सुविधा देण्यास शासन कटिबद्ध

राज्य शासनाची विकासाभिमुख भूमिका कायम असून सर्वसामान्यांना सन्मानाचे घर, अधिक रोजगाराच्या संधी, दर्जेदार नागरी सुविधा आणि आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सातत्याने कार्यरत राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# एसआयआर : मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न

मतदानाचा दिवस उजाडतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तो वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही; तो त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदीपासून सुरू होतो.

ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठी भारत निवडणूक आयोगा मार्फत वेळोवेळी यादी अद्यावत करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर). ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही; ती प्रत्येक पात्र नागरिकाच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.

**मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया**

घराचा मजबूत पाया दिसत नाही, पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी, निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते-मतदार यादीची अचूकता.

मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव, पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

**एसआयआर का आवश्यक आहे?**

दरवर्षी नियमित पुनरीक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद, माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशा वेळी एसआयआर राबविण्यात येते.

या विशेष पुनरीक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र मतदाराची नोंद शक्य तितकी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर, पत्त्यातील बदल, नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहितीमध्ये बदल होऊ शकतात. एसआयआर या सर्व बाबींकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम, पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते.

ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**घरभेट देणारा अधिकारी विश्वास जपणारा दुवा**

या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा, यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा असतो. त्याच्या नोंदींमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते.

ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो.

**ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हे प्रत्येक मतदारासाठी आहे**

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत समान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय.

एसआयआर ही कोणत्याही एका विभागासाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. तिचा सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने मतदान करता येण्याची खात्री.

या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे; तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

**उद्याच्या मतदानाचा विश्वास आजच्या सहभागातून**

लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. ती प्रत्येक वेळी बळकट होते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते.

एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे देऊन केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चिंतपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित राहत नाही; ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा पूल बनते.

प्रत्येक मत महत्त्वाचे असते, कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख, त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाहीवरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही कोणासाठी तरी नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय. आणि म्हणूनच, ही प्रक्रिया माझ्यासाठी आहे आणि त्यात सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे.

महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटींद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात, आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात. त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी, दावे व हरकतींची प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अचूक, सुरक्षित आणि निर्विघ्न राहावा, हा आहे.

**- सचिन अडसूळ,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**कोल्हापूर**

# कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेबाबत १० जुलै रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी:** भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत देशभरात १९ जून २०२६ ते २० जुलै २०२६ या कालावधीत 'कृषी पायाभूत सुविधा निधी' योजनेची विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी उद्योजकांनी कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन 'आत्मा'चे प्रकल्प संचालक यांनी केले आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून १० जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील कृषी विज्ञान केंद्र येथे एका दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

ऑगस्ट २०२० मध्ये 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत सुरू झालेल्या या योजनेचा मुख्य उद्देश पीक काढणीनंतरच्या पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करणे हा आहे. यामुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया आणि वाहतूक यांना मोठी चालना मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. या योजनेअंतर्गत बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या रु. २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच शासनामार्फत क्रेडिट गॅरंटीची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

या निधीचा वापर करून गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट आणि कस्टम हायरिंग सेंटर यांसारख्या विविध कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांची उभारणी करता येते. या योजनेसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहायता गट आणि कृषी क्षेत्रातील इतर पात्र संस्था अर्ज करू शकतात.

या विशेष मोहिमेदरम्यान जिल्ह्यात व्यापक जनजागृती, शेतकरी मेळावे, कार्यशाळा आणि बँक समन्वय बैठकांचे आयोजन केले जात आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकरी व संस्थांनी https://agriinfra.dac.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत तसेच अधिक माहितीसाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी, आत्मा कार्यालय, कृषी विभाग किंवा जवळच्या राष्ट्रीयीकृत व अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा, असे प्रशासनातर्फे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यात खरीप हंगामासाठी सुधारीत पीक विमा योजना लागू;

## ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** सन २०२६-२७ या वर्षापासून शासनाने खरीप हंगामासाठी सुधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. लातूर जिल्ह्यामध्ये ही योजना एस.बी.आय जनरल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ अशी निश्चित करण्यात आली असून, शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ई-पीक' नोंदणी करणे आणि 'फार्मर आयडी' असणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही योजना अधिसूचित मंडळात अधिसूचित पिकांसाठी लागू असून कर्जदार व बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी ती पूर्णपणे ऐच्छिक आहे.

योजनेंतर्गत ७० टक्के जोखीमस्तरावर विविध प्रमुख पिकांसाठी प्रति हेक्टर विमा संरक्षित रक्कम आणि शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये सोयाबीनसाठी ६२ हजार ५०० रुपये विमा संरक्षित रक्कमेवर १ हजार २५० रुपये हप्ता, कापसासाठी ६२ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर १ हजार ५४३.८० रुपये हप्ता, खरीप ज्वारीसाठी ३३ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर ६६० रुपये हप्ता, तर बाजरीसाठी ३२ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर ६४० रुपये हप्ता शेतकऱ्यांना भरावा लागेल. तसेच तूर पिकासाठी ४७ हजार रुपये रक्कमेवर ९४० रुपये, मूग पिकासाठी ३० हजार रुपये रक्कमेवर ४५० रुपये आणि उडीद पिकासाठी २७ हजार रुपये विमा संरक्षित रक्कमेवर ४०५ रुपये प्रति हेक्टर विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.

या योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा अवैध किंवा बोगस पीक विमा घेण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच, बोगस विमा घेतल्याचे आढळून आल्यास संबंधित खातेदाराला पुढील ५ वर्षांसाठी काळ्या यादीत टाकून त्याचा आधार क्रमांक ब्लॉक केला जाईल, तसेच त्या खातेदाराला पुढील किमान ५ वर्षांपर्यंत कृषी विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही. लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेवटच्या टप्प्यात गर्दी किंवा घाईगडबड न करता वेळेत आपल्या अधिसूचित पिकांच्या विमा संरक्षणासाठी नजीकच्या बँकेत अथवा नागरी सुविधा केंद्रांमार्फत अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे. या योजनेचा सविस्तर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०७०३१९३८३१०००१ असा आहे.

# लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक

**१३६८ अर्जाची छाननी**




**लातूर/प्रतिनिधी:** लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार ८ जुलै २०२६ बुधवार रोजी घेण्यात आली असून समितीचे अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पहिल्या बैठकीत प्रत्यक्ष दाखल केलेल्या ३०० अर्जाची छाननी करून २८० अर्ज मंजूर करण्यात आले तर उर्वरित ऑनलाईन दाखल केलेल्या १०६८ अर्जाची छाननी करण्यात येत आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार गठीत करण्यात आली आहे. गोरगरीब, सर्वसामान्य गरजू पात्र लाभधारकांना, निराधारासह विधवा आणि अपंगांना तात्काळ बैठक घेऊन लाभ द्यावा अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी नव्याने गठीत झालेल्या समितीस केली होती. सदरील सूचनेनुसार ८ जुलै बुधवार रोजी समितीचे अध्यक्ष बन्सीभाऊ भिसे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर तहसील कार्यालयात बैठक झाली. या बैठकीत प्रत्यक्ष दाखल केलेले ३०० अर्ज आणि ऑनलाईन दाखल केलेले १०६८ असे एकूण १३६८ अर्ज ठेवण्यात आले होते त्यापैकी प्रत्यक्ष दाखल केलेल्या ३०० अर्जाची छाननी करून २८० अर्जांना मंजुरी देण्यात आली तर उर्वरित त्रुटी असल्याने २० अर्ज नामंजूर करण्यात आले. उर्वरित ऑनलाईन दाखल केलेल्या अर्जाची छाननी करण्यात येत आहे. बैठकीच्या प्रारंभी समिती सचिव तथा तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समितीचे अध्यक्षासह सर्व सदस्यांचा सत्कार करून स्वागत केले.

लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीस समितीचे अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे, सचिव तथा तहसीलदार सौदागर तांदळे, सदस्य तथा गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, सदस्य परमेश्वर माधवराव पर्वते, सौ स्वाती किशोर घुट्टे, संतोष नारायण गायकवाड, अंकुश हरिभाऊ कुंभार, विनायक मल्हारी मगर, सदाम रशीद शेख, सदाशिव सोपान गव्हाणे, रुपेश सूर्यकांत काळे, बाबासाहेब साहेबराव भिसे यांच्यासह नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे, सौ सुषमा कोपरकर, महेश आदमाने आदी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# स्मशानभूमीसाठी गायरान जमिनी संपादित करून 'सामूहिक स्मशानभूमी' धोरण राबवा: आ. अमित देशमुख




**लातूर/प्रतिनिधी:** राज्यात स्मशानभूमीचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला असून, त्याकडे शासनानेगांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. तलाव, धरणे आणि रस्त्यांसाठीज्याप्रमाणे शासन जमिनींचे संपादन करते, त्याच धर्तीवर स्मशानभूमीसाठीही जमिनी संपादित कराव्यात आणि राज्यभर एक ठोस धोरण राबवावे, अशी मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत केली.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनातील प्रश्नोत्तराच्या तासात बुधवार दि. ८ जूलै २६ रोजी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी राज्यातील स्मशानभूमींच्या अपुऱ्या जागांचा प्रश्न मांडला. अनेक गावांत स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांची मोठी अडचण होत आहे. यावर उपाय म्हणून त्यांनी एक महत्त्वपूर्ण पर्याय सुचवला, जर एखाद्या गावात जागा उपलब्ध नसेल, तर आसपासच्या गावांपैकी ज्या गावात गायरान जागा उपलब्ध आहे, तिथे त्या परिसरातील गावांच्या वापरासाठी एक 'सामूहिक स्मशानभूमी' विकसित करण्याचा पर्याय शासन विचारात घेणार का? अशी विचारणा त्यांनी केली.

**शासनाची सकारात्मक भूमिका:**

या प्रश्नाला उत्तर देताना ग्रामविकास मंत्री मा.श्री.जयकुमार गोरे यांनी आमदार देशमुखांच्या सूचनेचे स्वागत केले. स्मशानभूमीचा प्रश्न सोडवणे ही सर्वांची सामुदायिक जबाबदारी असल्याचे मान्य करत, यावर नक्कीच मार्ग काढला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी मंत्री गोरे म्हणाले की, गायरान जमिनी संपादित करून अनेक गावांच्या सोयीसाठी किमान एक सामुदायिक स्मशानभूमी उभारण्यासाठी शासन पुढाकार घेईल. यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने निर्देश दिले जातील. तसेच, राज्यातील ज्या-ज्या ठिकाणी स्मशानभूमीसाठी जागेचा प्रश्न प्रलंबित आहे, त्याची माहिती मागवून तो प्रश्न निकाली काढण्यासाठी एक निश्चित धोरण शासन ठरवेल.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित केलेल्या या विषयामुळे राज्यातील ग्रामविकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयाची आशा निर्माण झाली आहे.

# एचटीबीटी कापसाला परवानगी द्या : शेतकरी संघटना

**लातूर/प्रतिनिधी:** गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी संघटना शेतकऱ्यांना बाजारपेठ व तंत्रज्ञान स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्न करीत आहे.जगभरात शेतकऱ्यांना उच्च उत्पादकता व गुणवत्ता असलेले जणुकीय आदला-बदलीतून निर्मीती केलेले बियाणे वापरास परवानगी दिली आहे.त्या माध्यमातून परदेशातील शेतकरी कमीतकमी उत्पादन खर्चात अधिकाधीक उत्पादन घेऊन नफा मिळवीत आहेत.मात्र त्या उलट भारतीय शेतकरी या तंत्रज्ञानापासून वंचित आहेत.जागतीक बाजारपेठेत परदेशी शेतकऱ्यांशी स्पर्धेत कमकुवत ठरत आहेत.भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी जय अनुसंधान हा नारा देत तंत्रज्ञान स्विकारण्याची घोषणा केलेली आहे.मात्र हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत जाऊ नये यासाठी सरकार प्रयत्न करत आहे.जणुकीय बदलातून उत्पादीत केलेले परदेशी दाळ, सोयाबिन तेल,पेंड, आयात करुन खायला घालते, मात्र भारतीय शेतकऱ्यांना उत्पादन करायला बंदी घातली गेली आहे. आता महाराष्ट्र राज्याच्या शेजारी असलेल्या गुजरात राज्यात शेतकरी राजरोसपणे एचटीबीटी कापसाची लागवड करीत आहेत,मात्र महाराष्ट्रात लागवडीसाठी बंदी घातली आहे.म्हणुन शेतकरी संघटना लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर,देवणी व शिरुर अनंतपाळ तालुक्यात दिनांक आकरा जुलै रोजी प्रातिनिधिक स्वरूपात एचटीबीटी कापसाची लागवड करुन जुलमी कायद्यचा सविनय कायदेभंग करणार आहे.अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी लातूर यांना शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आले.यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटील, युवा जिल्हाध्यक्ष रुपेश शंके, कार्याध्यक्ष बालाजी जाधव,शिरुर अनंतपाळ युवा तालुकाध्यक्ष अर्जून कावळे,संघटक अरुण बिरादार, जेष्ठ नेते दगडूसाहेब पडिले,इब्राहिम शेख, गंगाधर बिरादार, मधुकर महापुरे,श्रीनीवास बिरादार,संजिवन बिरादार आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय 'मिडकॉम्स २०२६'मध्ये एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉ. व्यंकटेश हंगे यांना 'सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण' पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी:** मुख व जबडा शस्त्रक्रिया विषयातील उल्लेखनीय संशोधनाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख व जबडा शल्य चिकित्सा विभागाचे सहयोगी प्रा. डॉ. व्यंकटेश हंगे यांना राष्ट्रीय स्तरावरील 'मिडकॉम्स २०२६' अधिवेशनात प्रतिष्ठेचा 'सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'एक परिपूर्ण शल्यचिकित्सक घडवणे' या संकल्पनेवर आधारित २८ वी मध्यावधी परिषद आणि १४ वे पदव्युत्तर अधिवेशन भारतीय मुख व जबडा शल्यचिकित्सक संघटनेच्या (एओएमएसआय) मध्य प्रदेश राज्य शाखेतर्फे २ ते ४ जुलै २०२६ या कालावधीत मध्य प्रदेशातील भोपाळ येथील पीपल्स विद्यापीठाच्या परिसरात आयोजित करण्यात आले होते.

डॉ. व्यंकटेश हंगे यांना 'अत्यंत झिजलेल्या वरच्या जबड्यात ट्रान्स-नाझल दंत रोपणाच्या यशाचा अंदाज वर्तवणारे गुणांकन प्रारूप' या विषयावरील नाविन्यपूर्ण वैज्ञानिक शोधनिबंधासाठी हा सर्वोच्च सन्मान मिळाला. अत्यंत झिजलेल्या वरच्या जबड्याच्या हाडांमध्ये ट्रान्स-नाझल दंत रोपण यशस्वी होण्याची शक्यता अचूकपणे वर्तविण्यासाठी त्यांनी विकसित केलेले गुणांकन प्रारूप क्लिष्ट शस्त्रक्रियांमध्ये शल्यचिकित्सकांना योग्य निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. गंभीर रुग्णांवरील उपचार अधिक सुरक्षित, अचूक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

या संशोधनाची दखल घेत वैज्ञानिक समितीने डॉ. हंगे यांना ४ जुलै रोजी झालेल्या 'दंतरोपण शास्त्र - १' या शास्त्रीय सत्राचे अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले होते. त्यांच्या संशोधन व शैक्षणिक योगदानाचा हा आणखी एक गौरव मानला जात आहे. तसेच क्लिष्ट दंत रोपण शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित, वैज्ञानिक आणि यशस्वी करण्याच्या दृष्टीने त्यांनी सादर केलेले संशोधन हे परिषदेचे विशेष आकर्षण ठरले.

भारतीय मुख व जबडा शल्यचिकित्सक संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणी व आयोजन समितीच्या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष डॉ. आशिष गुप्ता आणि नियुक्त अध्यक्ष तथा आयोजन अध्यक्ष डॉ. शाजी थॉमस यांच्या हस्ते डॉ. व्यंकटेश हंगे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मानद सरचिटणीस डॉ. कन्नन बालरामन, आयोजन सह-अध्यक्ष डॉ. अजय पिल्लई, आयोजन सचिव डॉ. निशांत राज चौरसिया, परिषद सचिव डॉ. मणिकंधन रामनाथन, वैज्ञानिक समितीच्या अध्यक्षा डॉ. सुस्मिता राजमोहन व्यास आणि कोषाध्यक्ष डॉ. प्रशांत एम. सी. उपस्थित होते.

तीन दिवसीय या राष्ट्रीय परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख व जबडा शल्यचिकित्सा विभागाचे प्रा. डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. गोविंद चांगुले यांच्यासह देशभरातील नामवंत मुख व जबडा शल्यचिकित्सक, संशोधक आणि पदव्युत्तर विद्यार्थी सहभागी झाले होते.

डॉ. व्यंकटेश हंगे यांच्या या यशाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उपप्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, मुख व जबडा शल्यचिकित्सा विभागाचे प्रमुख डॉ. सीराज बादल व डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. गोविंद चांगुले, डॉ. गोपाळ नागरगोजे, डॉ. आरती पाटील, डॉ. धनंजय काळे तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि दंत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांनी त्यांचे अभिनंदन केले.



# राज्यपालांच्या उपस्थितीत कचरावेचक महिलांसाठी टीबी मुक्त मुंबई अभियान




**मुंबई/ प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकभवनच्या पुढाकाराने व बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या सहकार्याने सुरु करण्यात आलेल्या 'टीबी मुक्त मुंबई' अभियान अंतर्गत कचरा वेचक महिलांसाठी फाईन आर्ट सोसायटी चेंबूर मुंबई येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर व 'नमस्ते' योजनेचा शुभारंभ करण्यात आला. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल तसेच अभिनेते जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते कचरा वेचक महिलांना 'आयुष्यमान कार्ड' व आरोग्य रक्षणासाठी पीपीई किट देण्यात आले. कार्यक्रमाला कचरा वेचक महिलांच्या उत्थानासाठी कार्य करीत असलेल्या सुशीला साबळे, नगर सेविका व प्रभाग समितीच्या अध्यक्षा आशा मराठे, पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता लवंगारे वर्मा, अतिरिक्त आयुक्त डॉ विपीन शर्मा, ज्योती म्हापसेकर, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थानं) डॉ. किरण दिघावकर व देवनार परिसरातील कचरा वेचक महिला आदी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# एसआयआर करा, नाहीतर मतदार यादीतून नाव गायब!

धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- देशातील मतदार याद्यांची शुद्धता राखण्यासाठी निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या विशेष सघन पुनर्पडताळणी (SIR) मोहिमेत धक्कादायक चित्र समोर आले आहे. ओडिशा, मणिपूर, मिझोराम आणि सिक्कीम या चार राज्यांतील २२ लाखांहून अधिक मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत.

या कारवाईमुळे एकीकडे बनावट व मृत मतदारांची नावे कमी करण्याचा आयोगाचा दावा असला, तरी दुसरीकडे लाखो नागरिकांना मतदानाच्या मूलभूत अधिकारापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

**एसआयआर म्हणजे काय?**

SIR (Special Intensive Revision) म्हणजे मतदार यादीची विशेष सखोल पडताळणी. या प्रक्रियेत प्रत्येक मतदाराची ओळख, वास्तव्यासंबंधी माहिती, मृत्यू, स्थलांतर, दुबार नोंदणी आदींची तपासणी करून अंतिम मतदार यादी तयार केली जाते.

**२२ लाख नावे वगळली, पण संधी अजूनही आहे**

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, ज्या मतदारांची नावे मसुदा यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांना आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करून नाव पुन्हा समाविष्ट करण्याची संधी दिली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी निष्काळजीपणा न करता स्वतःचे नाव मतदार यादीत आहे की नाही, याची तातडीने खात्री करून घ्यावी.

विशेष सघन पुनर्पडताळणी मोहिमेदरम्यान देशातील अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतदार यादीची छाननी करण्यात आली आहे.

चार राज्यांत मिळून २२ लाखांहून अधिक नावे वगळण्यात आली.

एकूणच देशभरात अंदाजे ६ कोटी मतदारांची नावे विविध कारणांमुळे वगळण्यात आल्याचे समोर आले आहे.

या कारवाईवर अनेक विरोधी पक्षांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, निष्पक्षता आणि पारदर्शकतेबाबत शंका व्यक्त केली आहे. तर निवडणूक आयोगाने मात्र ही प्रक्रिया पूर्णपणे नियमांनुसार आणि लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी राबविण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

मतदार यादीतून नाव वगळले जाणे म्हणजे केवळ एक नाव कमी होणे नव्हे, तर लोकशाहीतील नागरिकाचा घटनात्मक अधिकार धोक्यात येणे होय. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःचे नाव मतदार यादीत आहे का, याची खात्री करून घ्यावी. आवश्यक असल्यास त्वरित अर्ज करून नाव पुन्हा समाविष्ट करून घ्यावे.

तुमचा एक मताचा अधिकार हा देशाच्या लोकशाहीचा पाया आहे. तो गमावू नका; आजच तुमचे नाव मतदार यादीत तपासा.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात मुरूम येथे भव्य आरक्षण बचाव मोर्चा...

मुरूम (प्रतिनिधी)- अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून आरक्षण संपविण्याच्या प्रयत्नांविरोधात मुरूम शहरात आरक्षण बचाव मोर्चा शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विविध सामाजिक संघटना, संविधानप्रेमी नागरिक, युवक-युवती, महिला व भीमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाची सुरुवात मुरूम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहर वाचनालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. संविधान व सामाजिक न्यायाचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त करत घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला. हा मोर्चा मुरूम शहरातील प्रमुख मार्गावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाल्यानंतर मुकेश सोनकांबळे, भालचंद्र लोखंडे, धीरज बेळंबकर, उमेश सुरवसे, विश्वभूषण लिमये, गुरवे सर, एस. के. चेले, दिलीप भालेराव, कैलास शिंदे, दिनेश भालेराव, हरीश डावरे, आनंद कांबळे आदींनी संविधान, सामाजिक न्याय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि आरक्षणाचे महत्त्व या संबंधांनी मार्गदर्शन करताना आरक्षण हे वंचित समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीचे प्रभावी साधन असून अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण कोणत्याही परिस्थितीत मान्य होणार नाही, अशी ठाम भूमिका मांडली. जाहीर सभा संपल्यानंतर मोर्चाच्या वतीने मुरूम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल चासकर यांच्याकडे निवेदन देण्यात आले. या निवेदनात अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ रद्द करावे, आरक्षणाला कोणत्याही प्रकारे धक्का लागू देऊ नये आणि संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या अधिकाराचे संरक्षण करावे, अशी ठाम मागणी करण्यात आली. या मोर्चा करिता झुंबर बनसोडे, आनंद कांबळे, किरण गायकवाड, सुरज कांबळे, गौतम कांबळे, दिनेश भालेराव, प्रदीप गायकवाड, अभिजीत कांबळे, अजय गायकवाड, गोपी कांबळे, अमोल बनसोडे, जयपाल सुरवसे, राम सागर आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. मोर्चाच्या माध्यमातून संविधानाचे संरक्षण, सामाजिक न्यायाची जपणूक आणि अनुसूचित जातीच्या आरक्षणावरील उपवर्गीकरणाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. नियोजनबद्ध, जनसहभाग आणि मान्यवरांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे आरक्षण बचाव मोर्चा यशस्वी झाल्याचे दिसून आले.





स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

सत्यमेव जयते

पुण्यश्लोक 300

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव (उपचिटणीस शाखा)

मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१

Email Id-rdc1osmanabad@gmail.com

जा.क्र २०२५/उपचिटणीस/एमएजी-४/कावि-२१०४/ सिआर-५४३ दिनांक :- निम्नस्वाक्षरीत

### जाहिर प्रगटन
### (विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)

सर्व नागरिक मौजे. कडकनाथवाडी ता.वाशी जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, **कडकनाथवाडी** ता. वाशी जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर **१३५६** मध्ये **श्री देवेंद्र भारत सरवदे** रा. तेरखेडा ता. वाशी यांनी शोभेची दारू तयार (फटाका निर्मिती) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २० विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-१ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू – शेत रस्ता**
**२. पश्चिम बाजू – भरत भाऊ सरवदे**
**३. दक्षिण बाजू – सुरज मोहन राऊत**
**४. उत्तर बाजू – श्रीरंग गणपती टेकाळे**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशी मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, वाशी/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य नांदेड यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, **श्री देवेंद्र भारत सरवदे रा. तेरखेडा** ता. वाशी यांना मौजे. कडकनाथवाडी ता. वाशी येथील जमीन गट नंबर १०० /अ/३ मध्ये शोभेची दारू तयार करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नं.२० स्फोटक नियम-२००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-१ ची परवानगी देणेबाबत कोणास **कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले** पासून (०८) दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

Digitally Signed by
Vidyacharan Jagannath Kadavkar
Date:04-07-2026 18:53:34

**(विद्याचरण कडवकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव.**

जिमाका/एके/जाहि/४९


# पद्म पुरस्कारांसाठी शिफारसी सादर करण्याचे आवाहन ; ३१ जुलैपर्यंत ऑनलाइन प्रस्ताव स्वीकारणार

धाराशिव दि.८ जुलै (जिमाका)केंद्र शासनाच्या पद्म पुरस्कारांसाठी शिफारस प्रस्ताव सादर करण्याबाबत शासनाने निकष स्पष्ट केले असून,पात्र व्यक्तींच्या नावांची शिफारस करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी कार्यालय,विभागीय आयुक्त कार्यालय तसेच मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावर पात्र व्यक्तींच्या शिफारसी ३१ जुलै २०२६ पर्यंत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने सादर कराव्यात.निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारे नामांकन अथवा शिफारसी स्वीकारल्या जाणार नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. शासनाने जारी केलेल्या निकषांनुसार,पद्मभूषण पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस पद्मश्री पुरस्कार प्राप्त केल्यानंतर पाच वर्षांनी,तर पद्मविभूषण पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस पद्मभूषण पुरस्कार प्राप्त केल्यानंतर पाच वर्षांनी करता येईल.मात्र, अपवादात्मक प्रकरणांमध्ये ही अट शिथिल करण्याचा विचार केला जाऊ शकतो.

तसेच,शासकीय सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रमांतील डॉक्टर व वैज्ञानिक वगळता अन्य कर्मचारी व अधिकारी पद्म पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत,असेही शासनाने स्पष्ट केले आहे. वरील निकषांच्या आधारे शिफारसयोग्य प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय,विभागीय आयुक्त कार्यालय व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावर https://awards.gov.in या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने ३१ जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत.त्यानंतर या पोर्टलवर कोणतेही नामांकन अथवा शिफारस स्वीकारली जाणार नाही. असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.


## लातूर समाचार धाराशिव
## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


**परिशिष्ट-३**

**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग,**
**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव यांचे कार्यालय**

पत्ता:- नविन सिंचन भवन, तुळजापूर बायपास रोड, धाराशिव- 413501
ई-मेल:- eemechdobd@gmail.com दूरध्वनी क्र. :- (02472) 251853

**निविदा सूचना क्र.३ सन 2026-2027**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे खाली नमूद केलेल्या कामाचा पूर्वानुभव असलेल्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ब-१ नमुन्यात (ऑफलाईन) निविदा मागवित आहेत. शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र. संकीर्ण/1117/प्र.क्र.104/17/ यांत्रिकी, दि. 14/03/2018 अन्वये "निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही." सविस्तर निविदा सूचना शासनाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| कामाचे नाव | निविदेची किंमत रु |
|---|---|
| 1) यांत्रिकी विभाग धाराशिव अंतर्गत उप अभियंता, यांत्रिकी उप विभाग लातूर यांचेकडील निरीक्षण वाहन क्रमांक MH-25 BA 9616 करिता वाहनचालक-01 नग यांची सेवा बाह्य अभिकरणा मार्फत घेणे बाबत | 331968.00 |
| 2) विभागीय कार्यालय व कार्यालय परिसर सुरक्षेकरिता सुरक्षाक्षक (2) नग आणि विभागीय कार्यालयातील स्वच्छतागृह साफ करणे करीता सफाईकामगार- Sweeper (01) नग यांच्या सेवा एक (01) वर्षाकरीता बाह्य अभिकरणामार्फत घेणे | 774176.00 |

**जिल्हा :-** **धाराशिव**
**कोऱ्या निविदा संच विक्री कालावधी:-** दि.16-07-2026 रोजी सकाळी 11.00 वा. पासून ते दि.-23-07-2026 रोजी सायं. 18.00 वा.पर्यंत
**निविदा सादर करण्याचा दिनांक** दि.16-07-2026 रोजी सकाळी 11.00 वा. पासून ते दि.-24-07-2026 रोजी सायं. 18.00 वा.पर्यंत
**निविदा उघडणेचा दिनांक :-** दि.27-07-2026 रोजी सकाळी 11.00 वा.रोजी (शक्य झाल्यास)

**खालील ठिकाणी निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१) संकेतस्थळ :- www.wrd.maharashtra.gov.in
२) सदर निविदेसूचनेमध्ये / निविदांमध्ये काही बदल होत असल्यास असे बदल फक्त या कार्यालयाचे सूचनाफलकावर प्रसिद्ध करणेत येतील (वृत्तपत्रात प्रसिद्ध केले जाणार नाही.)
३) निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

**जा.क्र. यांविधा/लेखा/निविदा/ 1245 /सन 2026**
**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव यांचे कार्यालय,**
**दिनांक :- 06-07-2026**

**(यु. ई. मरेमपल्ली)**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, धाराशिव**

जिमाका/एके/जाहि/४५

## Name of Change Declaration
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SAGAR JAYSHREE VILASRAOJI.**
TO **SAGAR JAYSHRI SUDHAKAR.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SAGAR JAYSHRI SUDHAKAR. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SAGAR JAYSHREE VILASRAOJI.**
NEW NAME:- **SAGAR JAYSHRI SUDHAKAR.**
Address :- SHIVNERI NAGAR,SANJA BY PASS ROAD,NEAR THAPARE BUILDING,OSMANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 608354850271
Mob. No.-9923199489

## Name of change Declaration
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **NANDURGE FIZA BEGUM SALAUDDIN.** TO **FIJA ALIM SAYYAD.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the FIJA ALIM SAYYAD. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **NANDURGE FIZA BEGUM SALAUDDIN.**
NEW NAME:- **FIJA ALIM SAYYAD.**
Address :- 26/565,OPP. INTAK BHAVAN OFFICE, SAMARTH NAGAR, OSMANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 806968025588
Mob. No.- 8177859575

## Name of change Declaration
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **PATHAN JILANI MURAD KHAN.** TO **PATHAN JILANI MURADKHA.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the PATHAN JILANI MURADKHA. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **PATHAN JILANI MURAD KHAN.**
NEW NAME:- **PATHAN JILANI MURADKHA.**
Address :- BACK SIDE HOMEGARD OFFICE, OSMANABAD. DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 445132939221
Mob. No.- 9623851303



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649